# हाता-पायांत घालायचे अलंकार



## अलंकारांविषयीचे शास्त्र अन् सूक्ष्मातील प्रयोग !

## विषयसूची


卐 ग्रंथाचे संकलक आणि काही सूक्ष्म-ज्ञानप्राप्तकर्ते साधक यांचा परिचय ! ६

卐 मनोगत ९

卐 अलंकार विकत घेतांना घ्यावयाची काळजी ११

卐 ग्रंथात दिलेल्या सूक्ष्म ज्ञानाविषयीच्या प्रयोगांची वैशिष्ट्ये १२

卐 सूक्ष्म परीक्षणातील सूत्रे आणि अध्यात्मशास्त्रातील सिद्धांतांनुसार असलेले ज्ञान यांतील भेदाचे कारण १३


## ग्रंथाची अनुक्रमणिका


१. बाहुबंध (बाजूबंद) १४

२. बांगड्या (कंकणे) १९

३. अंगठी ६३

४. पैंजण ६८

५. जोडवी ७८

६. मासोळी ८२

७. विविध अलंकारांचा विचार मनात आल्यावर साधिकेला त्यांचे जाणवलेले परिणाम आणि कार्य ८७

८. अलंकारांशी संबंधित देवता, देवतेचा कार्यरत होणारा भाव, अलंकार परिधान करणारा आणि पहाणारा यांचा भाव ८९

९. आध्यात्मिक त्रास असणारे अन् नसणारे जीव यांना अलंकार परिधान केल्यामुळे तारक आणि मारक स्तरांवर होणारे लाभ ८९

१०. विविध अलंकारांमुळे जिवाला येणाऱ्या अनुभूतींचे प्रमाण ९०

११. आचारधर्मानुसार अलंकार त्या त्या स्थानीच घालण्यामागचे महत्त्व विशद करणारे सूक्ष्म ज्ञानाविषयीचे प्रयोग ९०

卐 संकलकांचा वैज्ञानिक दृष्टीकोन आणि अन्य माहिती १०१

**परात्पर गुरु डॉ. आठवले यांच्या आध्यात्मिक उत्तराधिकारी सद्‌गुरु (सौ.) बिंदा सिंगबाळ आणि सद्‌गुरु (सौ.) अंजली गाडगीळ यांच्या नावांआधी विशिष्ट आध्यात्मिक उपाधी लावण्यामागील कारण**

नाडीपट्टीवाचनाच्या (नाडीभविष्याच्या) माध्यमातून सप्तर्षी सनातनला मार्गदर्शन करतात. १३.५.२०२० या दिवशी सप्तर्षींनी सांगितले, 'यापुढे सद्‌गुरु (सौ.) बिंदा सिंगबाळ यांना 'श्रीसत्‌शक्ति (सौ.) बिंदा सिंगबाळ' आणि सद्‌गुरु (सौ.) अंजली गाडगीळ यांना 'श्रीचित्‌शक्ति (सौ.) अंजली गाडगीळ' असेच संबोधावे; कारण या नावांतून दोघींना देवीतत्त्व मिळेल, तसेच याचा लाभ त्यांच्या नावांचा उल्लेख करणाऱ्यांनाही होईल.' सप्तर्षींच्या आज्ञेनुसार तसे संबोधणे चालू केले आहे. यांच्या नावातील संबोधनाविषयी परात्पर गुरु डॉ. आठवले यांनी सांगितले, ''श्रीसत्‌शक्ति' ही भगवंताच्या शाश्वत स्वरूपाशी संबंधित आहे आणि 'श्रीचित्‌शक्ति' ही भगवंताच्या वैश्विक ज्ञानाशी संबंधित आहे.''

**सनातनच्या ग्रंथकार्यात सहभागी होऊन समष्टी साधना करा !**

- 卐 मराठी भाषेतील ग्रंथांचे संकलन करणे
- 卐 मराठी, हिंदी आणि इंग्रजी ग्रंथांचे विविध भाषांत भाषांतर करणे
- 卐 ग्रंथांची संरचना 'इन्‌डिझाईन' या संगणकीय प्रणालीत करणे

या कार्यांत सहभागी होण्यासाठी संपर्क करा -

(०८३२) २३१२३३४ किंवा granthgoa@gmail.com

# मनोगत

प्रभु श्रीरामचंद्र रावणवध करून सीतेची सुटका करतात. ‘स्त्रीने वस्त्रालंकारांनी सुशोभित होऊन पतीच्या सन्मुख गेले पाहिजे’, असे तेव्हा त्रिजाता नावाची एक राक्षसीण संन्यासिनीचा वेश केलेल्या सीतेला उपदेशिते ! युगायुगांपासून अलंकार हे स्त्रीधर्म, पातिव्रत्य आणि शालीनता यांचे अभिजात दर्शन घडवणारे आहेत. अलंकारांमुळे दैवीतत्त्वाचा लाभ होतो, तसेच वाईट शक्तींच्या त्रासांपासून रक्षण होण्याचे ते एक सुलभ साधनही आहे. दुर्दैवाने सध्याच्या पिढीतील स्त्रियांना अलंकारांचे महत्त्व वाटत नाही किंवा त्या अलंकारांकडे ‘फॅशन’ म्हणून पहातात. काचेच्या बांगड्या न घालता प्लास्टिकच्या बांगड्या घालणे; एका हातात घड्याळ आणि दुसऱ्या हातात एखादीच बांगडी घालणे; बाहुबंध, मासोळी यांसारखे अलंकार ‘ओल्ड फॅशन’ म्हणून न वापरणे यांसारख्या अयोग्य गोष्टी रूढ होत आहेत. प्रस्तूत ग्रंथात दिलेले अलंकारांचे महत्त्व, कार्य आणि ते घालण्यामागील सूक्ष्म स्तरावरील कारणमीमांसा यांमुळे अलंकारांकडे पहाण्याची नवी आध्यात्मिक दृष्टी लाभेल.

सात्त्विक अलंकार लाभदायक असतात, तर तामसिक (आसुरी) अलंकार त्रासदायक असतात. या ग्रंथात सात्त्विक आणि तामसिक अलंकारांच्या संदर्भात सनातनच्या एका साधिकेने केलेले सूक्ष्म ज्ञानाविषयीचे प्रयोग दिले आहेत. प्रयोगात अलंकाराचे छायाचित्र, अलंकाराविषयी साधिकेने केलेले ‘सूक्ष्म ज्ञानाविषयीचे परीक्षण’ आणि शेवटी प्रयोगाचा निष्कर्ष दिला आहे. हे प्रयोग करणाऱ्या साधिकेला वाईट शक्तींचा तीव्र त्रास असला, तरी तिच्यातील ‘तळमळ’ आणि ‘जिज्ञासूवृत्ती’ या गुणांमुळे तिचे ‘सूक्ष्म ज्ञानाविषयीचे परीक्षण’ सत्य आले आहे. ‘अध्यात्म’ हे अनुभूतीचे शास्त्र असल्याने, वाचकांनी प्रथम अलंकाराच्या छायाचित्राकडे पाहून सूक्ष्मातून काय वाटते, म्हणजे चांगले कि त्रासदायक वाटते किंवा एखादी अनुभूती येते का, हे पहायचा प्रयत्न करावा. प्रत्येकाची प्रकृती, सूक्ष्मातील जाणण्याची क्षमता आणि साधना यांनुसार त्याला प्रयोगात

निरनिराळे जाणवू शकते. प्रयोगाद्वारे अलंकार सात्त्विक कि तामसिक, हे ओळखायचा प्रयत्न करावा. त्यानंतर प्रयोगासंबंधीचे ‘सूक्ष्म ज्ञानाविषयीचे परीक्षण’ वाचावे. ‘सूक्ष्म ज्ञानाविषयीचे परीक्षण’ वाचल्यानंतर निष्कर्ष वाचण्यापूर्वी स्वतः त्याविषयी चिंतन करावे आणि मगच निष्कर्ष वाचावा. यामुळे वाचकांचा सूक्ष्मातील अभ्यास होऊन अलंकार विकत घेतांना (खरेदी करतांना) ‘तो सात्त्विक कि तामसिक आहे’, हे ओळखता येण्यास साहाय्य होईल.

अलंकारांचा अध्यात्मशास्त्रीय लाभ होण्यासाठी सर्वच अलंकार घालणे आवश्यक नसून आर्थिक परिस्थितीनुसार मोजकेच अलंकार घातले तरी चालते. सोन्याच्या अलंकारांपेक्षा चांदीचे अलंकार परवडण्यासारखे असतात. अलंकार घालण्यामागे भाव अधिक महत्त्वाचा असतो, हे लक्षात ठेवावे.

या ग्रंथाच्या वाचनाने अलंकारधारणाचे महत्त्व लक्षात येऊन अलंकाररूपी अमूल्य ठेवा देणाऱ्या हिंदु धर्माची महानताही लक्षात येवो, ही श्रीगुरुचरणी प्रार्थना ! – **संकलक**


**सात्त्विकता वाढवण्याविषयी मार्गदर्शक**
**सनातनची वेशभूषेविषयीची ग्रंथमालिका**



- खंड १ : कपडे ध्यात्मिकदृष्ट्या कसे असावेत ?
- खंड २ : स्त्रीसाठी आध्यात्मिकदृष्ट्या उपयुक्त असलेले कपडे
- खंड ३ : पुरुषांसाठी आध्यात्मिकदृष्ट्या उपयुक्त असलेले कपडे